Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)
ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA




Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com



Ajanta
Prakashan

Scanned with OKEN Scanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतीय संविधान निर्मिती प्रक्रीया, संविधानाचा अर्थ आणि ठळक वैशिष्ट्ये<br>**निरजकुमार देवमनराव अंभोरे** | १-४ |
| २ | राष्ट्रीय आंदोलनात गांधीजींचे योगदान<br>**प्रा. डॉ. आनंद के. भोयर** | ५-८ |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रवादाविषयीचे विचार<br>**प्रा. सी. के. भाजीखाये** | ९-१२ |
| ४ | 'इति अशांती' या नाटकातील अनुभूती नावीन्य<br>**प्रा. डॉ. भूषण आर. बंड** | १३-१६ |
| ५ | आदिवासींचे मानवी हक्क<br>**डॉ. प्रा. जयश्री देशमुख** | १७-२० |
| ६ | महाराष्ट्रातील जलसिंचन : एक आढावा<br>**प्रा. डॉ. लिलाधार डी. खरपुरिये** | २१-२६ |
| ७ | शिवाजी महाराजांचे कृषी व्यवस्थेतील योगदान<br>**प्रा. डॉ. कृष्णा मालकर** | २७-३० |
| ८ | भंडारा जिल्ह्यातील ग्रामीण विद्यार्थ्यांचे सामाजिक आर्थिक स्थिती व त्यांच्या शैक्षणिक विकासाचे सहसंबंधात्मक अध्ययन<br>**स्मिता रामकृष्ण गजभिये** | ३१-३५ |
| ९ | भारताच्या जडणघडणीत स्वामी विवेकानंदांचे योगदान<br>**डॉ. सुधाकर एन. पवार** | ३६-४० |
| १० | अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे आ. बच्चू कडू यांच्या नेतृत्वाचे विश्लेषणात्मक अध्ययन<br>**डॉ. प्रशांत दि. सातपुते** | ४१-४४ |
| ११ | जागतिक हवामान बदलाचा सर्वसमावेशक मानवी हक्कावरील प्रभाव<br>**प्रा. डॉ. संदीप बी. काळे** | ४५-५२ |
| १२ | संतांचे वाङमयीन कार्य<br>**प्रा. डॉ. मंदाकिनी मेश्राम** | ५३-५५ |



Scanned with OKEN Scanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रवादाविषयीचे विचार

**प्रा. सी. के. भाजीखाये**
सहयोगी प्राध्यापक, डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्स, पवनी.

**प्रस्तावना**

भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमतव व कार्य बहुआयामी असे आहे. त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे म्हटले जाते. अर्थतज्ञ, शोषित, पिडीत समाजाचे नेते, स्त्रियांच्या, कामगारांच्या, हक्कासाठी लढणारे, मुक समाजाचे नेतृत्व करून त्यांना वाचा फोडणारे युगप्रवर्तक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांना राजकारण, अर्थकारण आणि राज्यघटनेसंबंधी प्रगाढ ज्ञान होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्रवादाविषयी सुद्धा प्रगाढ ज्ञान होते. राष्ट्रवाद ही एक व्यक्तिनिष्ठ भावना असुन तिचा संबंध मानवी मनाशी आहे. तिचे सामर्थ्य अगाध असून तिची मुळे बळकट आहेत. मोठमोठाली साम्राज्ये ती उलथून पाडू शकते, आणि कुणी कितीही प्रयत्न केला तरी तिचे उच्चाटन होणे अशक्यप्राय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनात झालेला राष्ट्रवादाचा उगम.

राष्ट्रवादाचा उगम :– डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनात झालेला राष्ट्रवादाचा उगम गोरगरिबाबद्दल व दलित–अस्पृश्यांबद्दल त्यांना असलेल्या कळवळयात दिसून येतो. समान संधी व मानवी हक्क अनेक शतकानुशतके नाकारले गेल्यामुळे मानवी अस्तित्वालाही पारखे झालेले हे वर्ग हा समाज दास्यातून व दारिद्रयातून मुक्त झाल्याचखेरीज राष्ट्र–जीवनाशी समरस होवू शकणार नाहीत अशी डॉ. आंबेडकरांना खात्री होती. तीन्ही गोलमेज परिषदांमध्ये या उपेक्षितांचे अंतरंग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उघड केले होते. त्यांची स्थिती केवळ स्वातंत्र मिळून सुधारणार नाही हे त्यांना पक्के ठावूक होते. म्हणूनच स्वातंत्राची एकतर्फी मागणी करणा–या कॉंग्रेसच्या प्रयत्नांशी ते सहयोग देवू शकले नाहीत. परकीय वर्चस्वा बरोबर अंतर्गत छळानेही विरूद्ध डॉ. आंबेडकरांनी आवाज उठविला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समाजातील विषमता जाणवते. जमीनदार या देशाच्या रयतेचे करीत असलेले शोषण दिसते, तरीपण आपल्या सिंहासनाच्या स्थैर्यासाठी या दूषणांना हात लावायला ते धजत नाहीत. राज्यकर्ते अनूसूचित जाती–जमातींना हक्क मिळवून देण्यासाठी उत्साहाने प्रयत्न करीत नाहीत. या वर्गांना आपले किमान मानवी हक्क नाकररणा–याविरूद्ध ते आपली सत्ता वापरीत नाहीत या परिस्थितीवर डॉ. आंबेडकरांच्या मते एकच तोडगा होता आणी तो म्हणजे या जनतेला स्वातंत्र प्राप्त होणे. देशाचे स्वातंत्र व जनतेचे स्वातंत्र या दोन स्वतंत्र संकल्पना असल्याचे डॉ. आंबेडकर सांगतात. अनेक स्वतंत्र देशाची जनता या अर्थाने स्वतंत्र होतच नाही, अंतर्गत गुलामगिरीची ती भक्ष्य ठरते हे अमेरिकेतील निग्रोंचे उदाहरण देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सिद्ध केलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात राष्ट्राचे स्वातंत्र हे जर खरे खुरे स्वातंत्र व्हायचे असेल तर ते त्या



Scanned with OKEN Scanner